Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

महत्वाचे

**संदर्भ: विद्यापीठ संकेतस्थळावर तसेच दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात क्र. ३७/२०२४, दि. १३ सप्टेंबर, २०२४,**

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग, प्रशाळा, केंद्र, अध्यासन यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी आपल्याकडून सहयोगी शिक्षकांच्या (Contributory Teacher) मान्यतेच्या प्रस्तावास अनुसरून सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) मान्यता देण्यात आली आहे. तसेच काही अधिविभागांना मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी देण्यात आलेली मान्यता ही प्रथम सत्रासाठी (Odd Semester) समजण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी द्वितीय सत्रासाठी (Even Semester) सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) करिता Google form द्वारे माहिती मागविण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर दि. १३/०९/२०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, सदरची जाहिरात दैनिकामध्ये देखील प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी आपल्या अधिविभागामध्ये सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून सध्या कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना फक्त प्रथम सत्राकरिता मान्यता असलेने ते सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) द्वितीय सत्राकरीता इच्छुक असलेस विद्यापीठ संकेतस्थळावरील Recruitments Tab वर दिलेल्या Google form द्वारे त्यांना माहिती भरण्याबाबत अवगत करावे. तसेच विद्यापीठामधील / महाविद्यालयामधील नियमित, हंगामी शिक्षकांना विद्यापीठातील अन्य अभ्यासक्रमासाठी द्वितीय सत्राकरीता सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाचे कामकाज करावयाचे असल्यास, त्यांनी देखील Google form द्वारे माहिती भरावी. माहिती भरण्याची अंतिम मुदत ही दि. २५/०९/२०२४ पर्यंत आहे. विहित मुदतीनंतर कोणत्याही प्रकारे माहिती स्वीकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आदेशावरून,

कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/पीजी/3950
दिनांक : 19 SEP 2024

प्रति:

१. अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक,
सर्व अधिविभाग, प्रशाळा, केंद्र, अध्यासन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
-\ सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
२. लेखा विभाग - ॲकॅडमिक डिपार्टमेंट / स्कूल्स बिल्स युनिट यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरू व मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे कार्यालयास माहितीसाठी.